REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास', पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख ९ फेब्रुवारी, १९३८ अंक ६

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते.
भेटा अगर लिहा:—
**भाऊ गंगाधर साठे,** कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.



**अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय**
**झारापकर टेलरिंग कॉलेज**
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]


शिवणकलेचें अनुभविक शिक्षण मिळण्याचें हिंदुस्थानांत फक्त हें एकच ठिकाण
**दि मॉडर्न टेलरिंग इन्स्टिट्यूट**
डेक्कन जिमखाना, पुणें नं. ४
चालक-एम. एन. पाटसकर, F. C. D. (London)



स्टॉकिस्ट : बा. मो. कुलकर्णी, किराणा मालाचे व्यापारी,
[illegible] [illegible], पुणें २

**गव्हाचे पोहे**
(REGD.) **( BLOSSOM )** (REGD.)
कित्येकांना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात. विशेषतः लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्यांचा उपयोग हितकारी ठरतो.
ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधांतून खातां येतात.
७५३ सदाशिव पुणें २. — भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे कारखानदार.

**ब्यांकेच्या उतरत्या व्याजाचे काळांत**
डॉन ऑफ इंडियाच्या ६% मासिक आवर्त ठेव योजनेचा फायदा ता. ३१-३-३८ पर्यंत देण्यांत येईल. माहिती करितां लिहा.
जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.


**टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स**
[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क (काम) तयार करतात. ]
मो. मु. टिळक
प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर.

# विविध माहिती

### बार्शी लाइट रेल्वेचें उत्पन्न

१ ऑक्टोबर, १९३७ ते २० जानेवारी, १९३८ ह्या मुदतींत बार्शी लाइट रेल्वेस ५ लक्ष ९७ हजार रुपये इतकें उत्पन्न झालें. पूर्वीच्या वर्षाच्या ह्याच मुदतींतला उत्पन्नाचा आकडा ४ लक्ष ४० हजार रुपये असा होता.

### हिंदी तिळाच्या पिकाचा अंदाज

ज्या विषयीं विश्वसनीय माहिती आहे अशा हिंदी तिळाच्या पिकाचें क्षेत्र (एकूण ज्ञात व अज्ञात क्षेत्राच्या ८६ टक्क्यांइतकें) चालू हंगामांत ४२ लक्ष १७ हजार एकर आहे आणि हा आकडा गेल्या वर्षाच्या मानानें ९ टक्के अधिक आहे. तिळाचें एकूण उत्पादन ४ लक्ष ३८ हजार टन होईल असा अजमास आहे आणि ह्यांतहि पूर्वीच्या वर्षाच्या मानानें ९ टक्के वाढावा आहे. क्षेत्र व उत्पादन ह्यांचे बाबतींत संयुक्त प्रांताचा पहिला नंबर आहे.

### हिंदी नृत्यकलेचे लंडनमध्यें शिक्षणवर्ग

रागिणीदेवी हें हिंदी नांव धारण करणाऱ्या अमेरिकन स्त्रीनें ह्या देशांतील, विशेषतः मलबारांत रूढ असलेल्या नृत्यकलेचें ज्ञान मिळवलें असून लंडन युनिव्हर्सिटी एक्सटेंशन कमिटीच्या विद्यमानें इंडिया हाउसमध्यें तिचे हिंदी नृत्याच्या शिक्षणाचे वर्ग चालू झाले आहेत.

### लँकेशायरशीं इजिप्शन गिरण्यांची स्पर्धा

लँकेशायरच्या गिरणीवाल्यांस इजिप्तमध्यें तेथील स्वदेशी कपास कापडाच्या कारखान्यांची स्पर्धा बाधक होत आहे. तिची तीव्रता कमी होण्यासाठी सवलती मिळाव्या म्हणून लँकेशायरचें एक शिष्टमंडळ इजिप्शन मंत्र्यांस जाऊन भेटलें.

### ब्रिटिश कापडाची हिंदुस्थानांत आयात

गेल्या वर्षी ३५१½ कोटि चौरस वार लांबीचें मँचेस्टरच्या गिरण्यांचें कापड हिंदुस्थानांत आलें. १९३६ सालांत हा आकडा ४१३½ कोटि वार इतका होता. ब्रिटिश कापडाच्या आयातींत अलीकडे विलक्षण घट झाली आहे, ह्याचें कारण त्याची जागा स्वदेशी कापडानें घेतली आहे, हें होय.

### लठ्ठ आणि मठ्ठ !

लठ्ठ माणसें सुस्त असतात असें मत एका डॉक्टरांनीं व्यक्त केलें असतां तें खोडून काढण्यासाठी दुसऱ्या डॉक्टरांनीं लठ्ठ पण कर्तृत्ववान, अशा अनेक इतिहास-प्रसिद्ध पुरुषांचीं उदाहरणें दिलीं आहेत. त्यांत नेपोलिअन, डूमास, गँबेटा, ह्यूगो ह्यांचीं नांवें आहेत.

### परदेशी प्रवाशांपासून फायदा

परदेशांतून आलेले प्रवासी कॅनडा देशांत दरवर्षी ८० कोटि रुपये खर्च करतात आणि त्याचा फायदा व्यापाऱ्यांस व धंदेवाल्यांस होतो.

### दोन लढाऊ जहाजांचा ३६ कोटि रुपये खर्च !

दोन नवीं लढाऊ जहाजें बांधण्याचा अमेरिकन सरकारचा विचार असून त्यांप्रीत्यर्थ प्रत्येकीं १८ कोटि रुपये खर्चले जाणार आहेत !

### वॉल्ट डिस्नेचा नवा चित्रपट

"मिकी माउस"चा जनक, वॉल्ट डिस्ने, ह्यानें लांब पल्ल्याचा एक नवा चित्रपट तयार केला आहे. त्यास ३२ लक्ष रुपये खर्च आला आणि त्यासाठी अडीच मैल लांबीचीं चित्रें हातांनीं काढावीं लागलीं असें म्हणतात.

### हिंदी तागाच्या मालावर इंग्लंडमध्यें जकातीची मागणी

हिंदुस्थानांतील तागाच्या गिरण्यांचा माल ग्रेट ब्रिटनमध्यें जातो, त्यावर ब्रिटिश कारखान्यांच्या संरक्षणासाठी भरपूर जकात बसवली जावी अशी मागणी करण्यांत आली आहे.

### मोटारींचे अपघात

गेल्या सालीं मोटारींच्या अपघातानें ग्रेट ब्रिटनमध्यें एकूण ६,५९१ माणसें मृत्यु पावलीं आणि २२६,३३९ इसमांस दुखापत झाली.

### अमेरिकेंतील बेकारांची संख्या

अलीकडे केलेल्या गणतीवरून अमेरिकेंत एक कोटि लोक बेकार आहेत असें प्रसिद्ध झालें आहे.

### फ्रान्स आणि इंग्लंड ह्या देशांत धंद्यांमध्यें गुंतलेलीं माणसें

फ्रान्समध्यें कारखाने, शेती व व्यापार ह्या उद्योगांत अनुक्रमेंकरून ७५ लक्ष, ७५ लक्ष व ६० लक्ष माणसें गुंतलेलीं आहेत. ग्रेट ब्रिटनमध्यें हे आकडे १०५ लक्ष, १५ लक्ष व ९० लक्ष असे आहेत. म्हणजे, फ्रान्स देशांत शेती व कारखाने ह्यांस सारखेंच महत्व आहे, पण इंग्लंडांत कारखाने व व्यापार ह्यांचें प्राबल्य असून शेतीचा धंदा कमी महत्वाचा आहे.

### जगाच्या खाणींतून गेल्या वर्षी किती सोनें निघालें ?

जगांतील सर्व खाणींमधून १९३७ सालांत एकूण साडे तीन कोटि औंस सोनें बाहेर काढण्यांत आलें असा अंदाज आहे. ह्या उत्पादनाची किंमत अजमासें ३३० कोटि रुपये होते. भाव उतरला तरीहि सोन्याची जागतिक पैदास कमी होण्याची भीति नाहीं.

### पिकांच्या रोगांचें निवारण

पिकांचे रोग आणि त्यांवर पडणारी कीड ह्यांच्या निवारणासाठी शेतकीखात्यानें चालविलेल्या शास्त्रीय प्रयोगांचा प्रत्यक्ष उपयोग शेतकरीवर्गास होण्याबाबत कार्यक्षम व्यवस्था सुचवण्याच्या हेतूनें मुंबई सरकारानें शेतकीखात्याच्या मुख्य अधिकाऱ्याचे अध्यक्षतेखालीं एक लहान कमिटी नेमली आहे.

### मुंबई येथील रेडिओगृहाचें उद्घाटन

मुंबई येथील नवीन १० किलोवॅट शॉर्ट वेव्ह ब्रॉडकास्टिंग स्टेशनचें उद्घाटन गेल्या शुक्रवारीं इलाखाधिपति, सर रॉजर लम्ले, ह्यांनीं केलें. त्यावेळीं त्यांनीं आपल्या भाषणांत रेडिओच्या प्रसाराची आवश्यकता प्रतिपादन केली. हिंदुस्थानांत प्रत्येक दहा हजार माणसांगणिक एक रेडिओ आहे. मुंबई इलाख्यांत हेंच प्रमाण १०००:१ असें आहे व मुंबई शहरांत शंभर लोकांत एक रेडिओ असें प्रमाण पडतें. ग्रेटब्रिटनमध्यें व इतर अनेक देशांत रेडिओचा प्रसार सर्वत्र झालेला आहे. हिंदुस्थानांत लायसनदारांची संख्या वाढून रेडिओची उपयुक्तता सर्वांस पटली, म्हणजे सुधारणेचा मार्ग मोकळा होईल, असें इलाखाधिपतींनीं सांगितलें.

### अमेरिकेंतील चलन

अमेरिकेंतील ६०२ कोटि डॉलर ( सुमारें १,५०० कोटि रुपये ) किंमतीचें कागदी चलन व्यवहारांत खेळतें आहे. हा आकडा १९२९ सालाच्या मानानें दीडपट आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रु. किंमत |
|---|---|
| २३-१-३८ ते २९-१-३८ | १०,०७,१२० |
| ३०-१-३८ ते ५-२-३८ | ३७,८५,५५९ |
| २१-९-३१ ते ५-२-३८ | ३,१०,०९,२६,०२६ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ६२ |
| २ शेतकऱ्यांच्या सहायाचा कायदा ( अग्रलेख १ ) | ६३ |
| ३ हिंदी शेतीची सुधारणा ( अग्रलेख २ ) | ६४ |
| ४ स्फुट विचार ( १ ) सहकारी पतपेढ्या आणि नवीन कायदा (२) अन्नछत्रीं जेवून मिरपूड मागण्याचा प्रकार ( ३ ) सोन्याची विपुल पैदास पण साठवण्याची अडचण (४) प्रयोजनात्मक आर्थिक धोरण ( ५ ) अर्थशास्त्रीय ज्ञानासाठीं निधि ( ६ ) ब्रिटिश तज्ञाची हिंदुस्थानांत नेमणूक | ६५ |
| ५ तुपाच्या व्यापाराचें संघटन | ६६ |
| ६ शेतकरी व शेती मजूर | ६७ |
| ७ मुंबई प्राथमिक शिक्षण आणि शिक्षक वर्गांची स्थिति | ६८ |
| ८ एक महत्त्वाचा निवाडा | ६९ |
| ९ सहकारी चळवळ | ७० |
| १० निवडक बाजारभाव | ७१ |



# अर्थ

बुधवार, ता. ९ फेब्रुवारी, १९३८


## शेतकऱ्यांच्या सहायाचा कायदा

कर्जफेडीचे बाबतींत शेतकऱ्यांची स्थिति अलीकडे प्रचलित आर्थिक मंदीमुळें विशेष अडचणीची झालेली आहे. त्यांपैकी कित्येकांच्या डोक्यावरील दुसऱ्याच्या देण्याचा बोजा असह्य झाला आहे आणि गहाण लावलेल्या जमिनी सावकारांच्या स्वाधीन केल्यावांचून कर्जफेड होणें अशक्य होऊन बसलें आहे. सावकारांसहि कुळांकडून व्याज व मुद्दल वसूल होण्याची फारशी आशा न उरल्यानें ऋणकोंवर फिर्याद करून त्यांच्या जमिनी कर्जफेडींत घेण्याचा उपाय योजण्यावांचून गत्यंतर राहिलें नाहीं. शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनी सावकारांच्या हातीं गेल्या असतां त्यांस त्या खंडानें कराव्या लागणार; म्हणजे त्यांवर मजुरी करण्याचा प्रसंग येऊन उदरनिर्वाहाच्या निश्चित साधनास मुकावें लागणार. सावकार तरी, त्यांचा स्वतःचा धंदा शेतीचा नसल्यानें, नवीन ताब्यांत आलेल्या जमिनी जातीनें करूं शकत नाहींत. ह्यामुळें जमिनीच्या मशागतीची हेळसांड होऊन शेतीचें समाजास होणारें उत्पन्न मर्यादित होणें अपरिहार्य आहे. शेतकऱ्यांस कर्जफेड मामुली तऱ्हेनें करतां न आल्यामुळें उत्पन्न होणारी ही अनर्थपरंपरा कशी थांबवावी हा प्रश्न आज प्रांतिक सरकारांपुढें येऊन पडलेला आहे.

शेतकऱ्यांच्या डोईजड झालेल्या कर्जाच्या फेडीचा ह्या प्रकारचा पेच सोडवण्यास सावकारांचीं देणीं बुडवण्याचा कायदा करणें हा प्रथम-दर्शनीं सोपा दिसणारा मार्ग हा खरा उपाय नव्हे. ऋणको शेतकऱ्यांस त्यांच्या सावकारांनीं सरळ व्यवहाराच्या नात्यानें कर्जें दिलीं आणि योग्य मुदतींत त्यांची फेड होणें उचित आहे. नोकरी असो, दुकानदारी असो किंवा सावकारी असो, त्यांत देणारा व घेणारा ह्यांच्यामध्यें विनिमय होत असतो आणि त्याच्या अटी नीट पाळल्या जातील अशी व्यवस्था राज्यकर्त्यांस करावी लागते. देण्याघेण्याच्या व्यवहारांमधून, करार धाब्यावर बसवून, कोणीहि निसटूं लागल्यास त्याचें कृत्य बेकायदेशीर मानण्यांत येतें. समाजाचें जीवन, असल्या देवघेवी सुरळीत रीतीनें आणि ठरलेल्या अटींप्रमाणें पार पडण्यावर मुख्यत्वें करून अवलंबून असल्यानें सरकारनें त्यांचे संबंधांत कडक निर्बंध घातलेले असतात. तथापि, प्रत्येक नियमास अपवाद असतोच आणि ह्याच न्यायानें, बिकट परिस्थितींत देण्याघेण्याच्या करारांत अंमलबजावणीचे बाबतींत समाजहिताच्या दृष्टीनें सरकारास विशिष्ट कायद्यांस मुरड घालावी लागते. शेतकऱ्यांचे कर्जाचे बाबतींत हाच प्रकार घडलेला असून "दक्षिणेंतील शेतकऱ्यांच्या सहायाचा" म्हणून जो जुना कायदा आहे, त्याचा उद्देश व स्वरूप लक्षांत घेतल्यास वरील विचारसरणीचें रहस्य तेव्हांच समजण्यासारखें आहे.

शेतकऱ्यांच्या कर्जाचा बोजा असह्य झाला आहे, तो हलका करून सह्य मर्यादेत त्याची रकम आणणें आणि तिची फेड होण्यास मुदतीची आणि व्याजाची सवलत देणें हाच उपाय सद्यःपरिस्थितींत व्यवहारास अनुरूप आहे असें मानण्यांत येतें. सावकारांचीं कर्जें कमी करून तीं हप्तेबंदीनें फेडण्याची व्यवस्था करणें हा खरोखर निर्वाणीचाच उपाय आहे ह्यांत संशय नाहीं. तथापि, आपली पै न पै ठरल्याप्रमाणें वसूल झालीच पाहिजे असा धनकोंनीं आग्रह धरण्यांत समाजाचें व पर्यायानें त्यांचें स्वतःचेंहि हित नाहीं. शेतकऱ्यांचीं कर्जें तडजोडीनें कमी होऊन त्यांच्या फेडीस हप्तेबंदी मिळावी अशा प्रकारची व्यावहारिक स्वरूपाची अपरिहार्य झालेली व्यवस्था कायद्यानें घडवून आणण्याचें मुंबईच्या प्रधान मंडळानें ठरविलें आहे. परंतु त्या कायद्याचा मसुदा विधिमंडळापुढें मांडला जाऊन त्यास त्याची मान्यता मिळण्यास बराच वेळ लागणार आहे. दरम्यानच्या काळांत असल्या कायद्यानें स्वतःवर येणारी आपत्ति लक्षांत घेऊन सावकार आपल्या कुळांकडून कर्जें वसूल करण्याची शिकस्त केल्यावांचून रहाणार नाहींत. मध्यंतरीच्या काळांत आपल्या जमिनींस मुकण्याचें संकट गरीब शेतकऱ्यांवर येणार आहे आणि पुढें व्हावयाच्या कायद्याचा फायदा त्यांचे पदरांत पडण्याचे मार्गांत तो व्यत्ययच उद्भवणार आहे. प्रांतिक विधिमंडळापुढें शेतकऱ्यांच्या सहायाच्या कायद्याचा मसुदा गेल्या आठवड्यांत मांडण्यांत आला व चर्चिला गेला त्याचा मुख्य उद्देश हा व्यत्यय दूर करणें हा आहे. बिलांतल्या कित्येक कलमांवर असेंब्लीमध्यें कडाक्याचा वाद झाला. त्याचा विचार करतांना इच्छित कायद्याच्या मूलभूत हेतूच्या साफल्याची शक्याशक्यता लक्षांत घेतली जाणें अगत्याचें आहे.

एक वर्षपर्यंत म्हणजे सरकारनें योजलेला कर्जें कमी करण्याबाबतचा कायदा होईपर्यंत लहान खातेदारांवर सावकारांचे हुकुमनामे बजावले जाऊं नयेत हा शेतकऱ्यांच्या सहायाविषयींच्या बिलाचा उद्देश असल्यानें असेंब्लींत त्यास सुचविलेल्या दुरुस्त्या मान्य झाल्या नाहींत. कायद्याची योजलेली एक वर्षाची मुदत लांबवावी, "धारण करणारा"चे ऐवजीं "शेतकरी" हा शब्द घालावा, त्यामध्यें मजुरांचा समावेश व्हावा, धारण केलेल्या जमिनीच्या क्षेत्राची मर्यादा वाढवण्यांत यावी, सावकारांप्रमाणेंच सहकारी पतपेढ्यांसहि कायदा लागू करण्यांत यावा, खातेदारांवर अर्ज करण्याची जबाबदारी टाकण्यांत येऊं नये, एक वर्षाची व्याजाची रकम ऋणकोनें भरण्याची अट नसावी, तहकुबी देण्याबाबत कलेक्टरला दिलेला अधिकार काढून घ्यावा इत्यादि आशयाच्या अनेक उपसूचना असेंब्लीपुढें आल्या होत्या त्या बहुतेक सर्व अमान्य झाल्या. तहकुबीचा कायदा अनावश्यक कालहरण न होतां पसार होण्याची निकड असल्यामुळें बिलाची चर्चा गेल्या गुरुवारीं रात्रीं ११ वाजेपर्यंत चालून त्याचें तिसरें वाचन मान्य झालें. बिल लागलीच कौन्सिलपुढें मांडण्यांत येऊन शनिवारीं तेथेंहि तें मंजूर झालें.

## हिंदी शेतीची सुधारणा

### उद्बोधक माहिती

शेतीच्या धंद्याची सर्वांगीण सुधारणा आणि ती घडून येण्यास शास्त्रीय प्रयोग व सरकारी सहाय ह्यांचें हिंदुस्थानांत किती महत्त्व आहे हें आतां सांगण्याची आवश्यकता नाहीं. शेतीच्या धंद्याची अनेक अंगें आहेत आणि त्या सर्वांचे बाबतींत सारखी प्रगति झाल्यावांचून दिसण्यासारखा उत्कर्ष होणें कठीण आहे. शेतीचीं जनावरें, उपकरणें, बीं, खत, पाणीपुरवठा, पिकांवरील रोगांचा प्रतिकार, भांडवलाचा पुरवठा, मालाच्या विक्रीची सोय, अशा अनेक बाबी शेतीच्या धंद्याचे संबंधांत महत्वाच्या असून त्या सर्वांचा परामर्श घेतला जाणें अगत्याचें आहे. प्रांतिक प्रधान-मंडळांत ह्या अनेकविध विषयासंबंधानें अलीकडे चैतन्य उत्पन्न झालें आहे आणि लॉर्ड लिन्लिथगो ह्यांच्या व्हाइसरीगल कार-भारांत त्याबद्दल सक्रिय सहानुभूति दिसून येत आहे. परिस्थिति ह्याप्रमाणें पूर्वीच्या मानानें विशेष अनुकूल झालेली असून शेतीच्या धंद्याच्या उत्कर्षाविषयीं आशा वाटूं लागली आहे. मध्यवर्ती सर-कारच्या धोरणाच्या व कृतीचा विचार केला असतां त्यांत शास्त्रीय संशोधनाच्या संस्था, इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रि-कल्चरल रिसर्च आणि प्रांतिक सरकारांस दिलें जाणारें द्रव्य-सहाय ह्या गोष्टी त्याच्या विद्यमानें चालल्या आहेत, त्या प्रामु-ख्यानें डोळ्यापुढें उभ्या रहातात. इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च ह्या संस्थेचे उपाध्यक्ष, सर ब्राइस बर्ट, ह्यांनीं कांहीं दिवसांमागें दिल्ली येथून रेडिओच्या द्वारें ह्या विषया-बाबत बरीच माहिती दिली, ती उद्बोधक असल्यानें तिची जाणीव जनतेस होणें इष्ट आहे.

सर ब्राइस ह्यांच्या सारख्या जबाबदार अधिकाऱ्याच्या तोंडून सर्वसाधारण धोरणाविषयीं निघालेले उद्गार अत्यंत महत्वाचे समजले पाहिजेत. खेडेगांवांतल्या लोकांची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करणें हें राज्यकर्त्यांचें आदि कर्तव्य आहे असें त्यांचें म्हणणें आहे. उद्योगधंद्यांच्या बाबतींत पुढें गेलेल्या देशांमध्येंहि तेथील राज्यकर्ते आपल्या लोकांच्या शेतीची प्रगति घडवून आणण्याची खटपट करीत आहेत, तेव्हां ह्या मागसलेल्या देशांत असल्या प्रयत्नांचें अगत्य किती तरी पटींनीं अधिक आह हें सांगावयास नको, असें म्हणून ग्रामसुधारणेचा कार्यक्रम त्रिविध आहे असें त्यांनीं सांगितलें. आपली राहणी सुधारावी अशी इच्छा खेडेगांवी जनतेंत जागृत झाली पाहिजे हा पहिली गोष्ट, ती इच्छा फलद्रूप होण्याचें आर्थिक साधन हातीं असणें हा दुसरी गोष्ट आणि त्या साधनाचा उपयोग करण्याचें ज्ञान ही तिसरी गोष्ट होय. ह्या त्रिविध प्रगतीच्या संबंधानें सर ब्राइस बर्ट ह्यांच्या संस्थेच्या मार्फत व आश्रयानें कोणता कार्यक्रम पार पाडण्यांत येत आहे हें त्यांनींच दिलेल्या माहितीवरून आतां पाहूं.

पिकांच्या उत्पन्नांत सुधारणा व्हावी म्हणून शास्त्रीय संशोधन वगैरे करण्याच्या २२ संस्था हिंदुस्थानांत आहेत. प्रयोग आणि प्रत्यक्ष कृतीचें प्रदर्शन ज्यांत होतें अशीं ३०० फार्म्स आहेत. शिक्षक व प्रयोग करणारे वरिष्ठ व दुय्यम अधिकारी ८०० आहेत आणि शास्त्रीय शोधांचा उपयोग प्रत्यक्ष शेतीच्या व्यव-सायांत करून दाखवणारे २,००० अधिकारी आहेत. पिकांची पैदास सुधारण्याचे चार मार्ग आहेतः—(१) पिकांच्या नवीन जाती तयार करून उपयोगांत आणणें, (२) चांगलें बीं तयार करणें आणि वापरणें, (३) सकस खत घालून जमीनीची चांगली मशागत करणें आणि (४) कृमि-कीटक आणि रोग ह्यांचे पासून पिकांचें संरक्षण करणें. बाहेरून नवीन पिक आण-ण्याचें उत्तम उदाहरण म्हणजे भुइमुगाचें होय. सोळाव्या शत-काचे आरंभीं भुइमूग ह्या देशांत आला आणि गेल्या ८० वर्षांत तो महत्व पावला आहे. आज हिंदुस्थानांत ७० लक्ष एकरांत भुइमूग पेरला जाऊन त्याची वार्षिक पैदास ३० लक्ष टन होते आणि तिला ४० कोटि रुपये किंमत येते. इतकें मोठें भुइमुगाचें पीक दुसऱ्या कोणत्याहि देशांत नाहीं. सिगारेट्स बनवण्याच्या योग्य अशा तंबाखूच्या पिकाचेंहि असेंच उदाहरण देतां येईल. त्याच्या वार्षिक उत्पादनाचें वजन सुमारें ३ कोटि पौंड भरतें. प्रचलित पिकांच्या जातींचीच सुधारणा करण्याकडे व्यक्तिशः जमीनदारांचें लक्ष पाश्चात्य देशांमध्यें लागलेलें असतें. पण हिंदुस्था-नांत तें कार्य सरकारच्या मार्फत चालतें. पिकांवर प्रयोग करून तीं सुधारण्याचें काम ८३ ठिकाणीं चाललें असून ३० महत्त्वाचीं पिकें ह्यासाठी हातीं घेण्यांत आलीं आहेत व सुधारलेल्या पिकांचें क्षेत्र कमींतकमी अडीच कोटि एकर एवढें आहे आणि त्या सुधारणेच्या योगानें कितीतरी कोटि रुपयांची जादा प्राप्ती शेत-करी वर्गास होत आहे.

(अपूर्ण)


अपूर्व योगायोग

वेस्टर्न इंडिया

लाईफ इन्शुअरन्स कंपनी, लिमिटेड, सातारा.

या संस्थेचा

रौप्य महोत्सव आणि मूल्यमापन वर्ष

या संपूर्ण स्वदेशी आणि आदर्श विमा संस्थेचा

रौप्य महोत्सव

या वर्षअखेर साजरा होणार असून हेंच कंपनीचें

मूल्यमापन वर्ष

आहे हा एक अपूर्व योगायोग आहे. अग्रेसर भारतीय कंपन्यां-पैकीं आदर्श अशा या कंपनीच्या हजारों विमेदारांपैकीं एक आपण झालांत आणि कंपनीच्या आनंदांत व यशांत भागीदार झालांत तर ते आपणांस निःसंशय फायद्याचें होईल.

पहिल्या प्रतीचें त्रैवार्षिक बोनस

| हयातीनंतरचा विमा | हयातींतील विमा |
| --- | --- |
| रुपये ७५ | रुपये ६० |

विशेष माहितीकरितां पत्रव्यवहार करा.

मॅनेजर.

# स्फुट विचार

### सहकारी पतपेढ्या आणि नवीन कायदा

शेतकऱ्यांच्या सहायाच्या कायद्याचें बिल चर्चिलें जात असतां त्याच्या तिसऱ्या कलमाच्या दुरुस्तीची एक उपसूचना असेंब्लींत पुढें मांडण्यांत आली होती. तिचा उद्देश असा होता कीं सावकारांच्या हुकुमनाम्यांच्या अंमलबजावणीविरुद्ध शेतकऱ्यांस संरक्षण दिलें जावयाचें आहे, त्याच प्रकारचें संरक्षण सहकारी पतपेढ्यांच्याविरुद्ध त्यांच्या कर्जदारांस मिळावें. आपल्या कर्जदारांच्या जमीनी सावकारांस विकतां येणार नाहींत मग सहकारी संस्थांस व सरकारास आपल्या येण्याबद्दल त्या विकण्याचा प्रतिबंध कां होऊं नये ? असा मुद्दा येथें उपस्थित करण्यांत आला होता. सरकारतर्फेनें श्री. मुरारजी ह्यांनीं त्यास असें उत्तर दिलें कीं सहकारी सोसायट्या व सावकार ह्यांस एकाच माळेंत बसवणें योग्य नाहीं, कारण सोसायट्या शेतकऱ्यांच्या हिताकरितांच आणि स्वतः त्यांनींच चालवलेल्या असतात. शिवाय, शेतकऱ्यांस कर्जें मिळण्याचा कायमचा उपाय सरकारास योजावा लागेल तो सहकारी संस्थांच्या मार्फतच योजला पाहिजे. तरीहि सहकारी सोसायट्यांस, सावकारांस नाहींत त्या विशेष सवलती देण्याचा सरकारचा हेतु नाहीं. अशाच अर्थाचें स्पष्टीकरण श्री. मुनशी ह्यांनीं केलें. लवादांनीं दिलेल्या निवाड्यांची अंमलबजावणी करणें किंवा न करणें हें आजहि कलेक्टरच्या मर्जीवर सोपवलेलें आहे आणि त्यासंबंधांत जरूर ते हुकूम सरकारनें काढले आहेत असें त्यांनीं सांगितलें. सहकारी संस्था व सावकार ह्यांच्या कर्जाच्या येण्यांत अत्यंत महत्वाचा भेद आहे तो अनेक लोकांच्या लक्षांत येत नाहीं. सहकारी पतपेढी नफेबाजी किंवा वैयक्तिक फायदा करीत नाहीं आणि तिचे ऋणको हेच धनकोहि असतात.सावकार आणि कूळ ह्यांमधला विरोध सहकारी चळवळींत संभवत नाहीं. हें तत्व लक्षांत न वागवलें गेल्या कारणानें त्या चळवळींतल्या कित्येक लोकांचीहि दिशाभूल होत असते. ह्या विषयाचा उल्लेख कायदेमंडळांत होऊन सहकारी पतपेढ्यांच्या कार्याचा विशेष श्री. मुरारजी ह्यांनीं विशद केला हें चांगलें झालें. त्याची माहिती अधिक विस्तृत रीतीनें व स्पष्टपणानें वारंवार दिली जाणें अगत्याचें आहे. तिच्या अभावीं सहकारी चळवळीच्या प्रगतीस व कार्यक्षमतेस अडथळा येत आहे.

---

### अन्नछत्रीं जेवून मिरपूड मागण्याचा प्रकार !

हिंदुस्थानांतील सैन्यास आधुनिक यांत्रिक सामुग्री पुरवण्या प्रीत्यर्थ येणाऱ्या खर्चापैकीं कांहीं अंश ब्रिटिश सरकारकडून मिळावयाचा असल्याचें मागेंच प्रसिद्ध झालें आहे. ह्या गोष्टीचा उल्लेख मध्यवर्ती असेंब्लीमध्यें होऊन तिच्या विरुद्ध लोकमत स्पष्टपणानें व्यक्त करण्यांत आलें. यंत्रीकरणाच्या योजनेस एकूण खर्च २१५ लक्ष रुपये येईल आणि त्यांतले फक्त ८० लक्ष ब्रिटिश सरकार देईल. आधुनिक लष्करी प्रगतीच्या दृष्टीनें हिंदुस्थानांतील सैन्याचें यंत्रीकरण आवश्यक आहे ह्याविषयीं एकवाक्यता आहे. त्यासाठी लागणारा खर्च करणें हिंदुस्थानास प्राप्त आहे आणि येथील सरकारच्या विनंतीस मान देऊन साम्राज्य सरकारनें देणगी दिली असतां ती कमी आहे म्हणून टीका करणें हा कृतघ्नपणा आहे असें मि. आजल्व्ही ह्यांनीं सांगितलें. अन्नछत्रीं जेवून मिरपूड मागण्याचा हा प्रकार आहे असें त्यांनीं बोलून दाखविलें. ह्यावर हिंदी प्रतिनिधींचें म्हणणें असें होतें कीं ह्यांत देणगीचा प्रश्न मुळींच नसून उलट, हिंदुस्थानांतील सैन्यापैकीं ब्रिटिश विभागावर यंत्रीकरणाचा खर्च व्हावयाचा असल्यानें तो सर्वच्या सर्व इंग्लंडमधील सरकारानें सोसावयास हवा होता. त्यांतला मोठा बोजा हिंदी लोकांवर बसवून पुन्हा उदारपणाचा टेंभा ब्रिटिश सरकारास मिरवतां येत नाहीं असें हिंदी सभासदांचें उत्तर होतें. हिंदुस्थानांतल्या हिंदी विभागाच्या सुधारणेसाठीं जादा खर्च झाला असता तर त्यांत कांहीं तरी स्वारस्य होतें. पण सव्वा कोटींच्यावर खर्च सोसावयाचा हिंदी तिजोरीनें आणि त्याचा प्रत्यक्ष फायदा फौजेच्या हिंदी विभागास मिळावयाचा नाहीं हा न्याय नव्हे, हा असेंब्लींतल्या लोकप्रतिनिधींच्या भाषणांतील मुख्य मुद्दा होता. साम्राज्य सरकार हिंदी तिजोरीवर उदार होत आहे आणि लष्करी खर्चांत काटकसर होण्याची आवश्यकता असतां तो वाढवीत आहे.ही त्यांची तक्रार आहे. तिचा परिणाम मात्र सरकारी धोरणावर होण्याची अपेक्षा अर्थातच नाहीं.

---

### सोन्याची विपुल पैदास पण साठवण्याची अडचण

जगाच्या देवघेवीस आवश्यक असलेल्या सोन्याचा पुरवठा दिवसानुदिवस वाढला पाहिजे,तो उलट अपुरा होत जाणार अशी भीति कांहीं वर्षांमागें व्यक्त करण्यास येत असे. सर हेन्री स्ट्रॅकॉशसारखे तज्ञ ह्या संबंधांत भय सूचना देत होते आणि सोनें पुरवून पुरवून वापरण्याविषयीं उपदेश करीत होते. अलीकडच्या घडामोडींनीं त्यांचें भविष्य सर्वस्वी खोटें पाडलें आहे. जगाच्या खाणींचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत आहे. बाजारभाव उतरल्यानें आणि सोनें महागल्यामुळें चलनाचा आधार म्हणून त्याचा निधि कमी प्रमाणांत पुरेसा होतो. सध्याची अडचण अपुऱ्या पैदाशीची नसून विषम विभागणीची आहे. सोनें खाणींतून पुष्कळ निघालें तरी तें चालू भावानें विकत घेऊन साठवण्याचें सामर्थ्य कोणांमध्यें आहे ? इंग्लंड आणि अमेरिका ह्या देशांत सर्व सोनें जात असून तें निधींमध्यें साठवून व डांबून ठेवण्यावांचून त्यांस गत्यंतर नाहीं. हिंदुस्थानांत सोनें अत्यंत लोकप्रिय आहे, पण तें महागतांच सारखें बाहेर चाललें आहे.ह्या सोन्याचें करावयाचें काय हा प्रश्न अमेरिका व इंग्लंड ह्या राष्ट्रांपुढें आहे. भुकेलेल्यास अन्न मिळत नाहीं आणि पोट भरलेल्यास अन्नाचा अतिरेक होत आहे अशी अवस्था सोन्याच्या आंतरराष्ट्रीय विभागणीची झाली आहे. जागतिक व्यापाराच्या देवघेवींत सुधारणा होऊन ते व्यवहार व्यवस्थित आणि सुरळीत चालल्यावांचून हा प्रश्न सुटावयाचा नाहीं.

---

### प्रयोजनात्मक आर्थिक धोरण आणि प्रो. रॉबिन्स यांचा नवा ग्रंथ

वरील विषयावर इंग्लंडमधील तरुण पिढींतले अर्थशास्त्रज्ञ, मि. रॉबिन्स, ह्यांचा नवीन ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. परंपरागत ब्रिटिश मूलतत्त्वांवर त्याची उभारणी झालेली आहे. शांतता व मनुष्याच्या गरजा भागण्याची तरतूद हा आंतरराष्ट्रीय आर्थिक घटनेचा पाया आहे हा त्यांतला मुख्य मुद्दा आहे. प्रत्येक राष्ट्रानें आपल्यापुरती स्वतःच्या उद्योगधंद्यांची व व्यापाराची वाढ संकुचित दृष्टीनें बसवण्याचा प्रयत्न केला असतां संरक्षक जकाती, व्यापारविषयक निर्बंध, राज्यकर्त्यांची आर्थिक व्यवहारांत ढवळाढवळ इत्यादि अनिष्ट गोष्टींचें प्राबल्य होऊन व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट होतें.अनियंत्रित देवघेव बंद झाल्यानें वैमनस्य व युद्धें ह्यांचा मार्ग मोकळा केला

जातो. राष्ट्रीय योजनात्मक आर्थिक धोरण जितकें त्याज्य आहे तितकेंच व्यापार व धंदे ह्यांचें आंतरराष्ट्रीय व आंतर-औद्योगिक तत्त्वावर केलेलें संघटन अयोग्य आहे असा अभिप्राय प्रो. रॉबिन्स ह्यांनीं व्यक्त केला आहे. ह्या प्रकारच्या योजनांच्या योगानें व्यक्ति-स्वातंत्र्य नाहींसें होऊन उत्पादन-सामर्थ्य व प्राप्ती ह्यांच्या मधला दुवा तुटतो असें त्यांचें म्हणणें आहे. आंतरराष्ट्रीय समाजसत्तावाद अव्यवहारिक असल्यानें तोहि त्यांनीं सोडला आहे आणि शेवटीं अनियंत्रित व्यापार व व्यक्तिगत आर्थिक स्वातंत्र्य ह्यांचीच जगानें कास धरली पाहिजे असा निष्कर्ष काढला आहे! शांतता, समता व न्याय ह्याच योगानें प्राप्त होतील असा त्यांचा दृढ विश्वास आहे. तत्त्व आणि व्यवहार ह्यांचा परस्पर-विरोध प्रो. रॉबिन्स ह्यांचें ग्रंथांत स्पष्ट दृष्टोत्पत्तीस येत आहे.

---

## अर्थशास्त्रीय ज्ञानाच्या प्रसारासाठीं तीन कोटि रुपयांचा निधि

पाश्चात्य कारखानदार धंद्यामध्यें कोट्यवधि रुपये मिळवतात, पण त्यांतले कित्येक लोक ज्ञानाचा व सामान्य जनतेच्या सुख-सोयींचा प्रसार व्हावा ह्या हेतूनें कोडो रुपयांच्या देणग्याहि सढळ हातानें देतात, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. जनरल मोटार्स कॉर्पोरेशन ह्या अमेरिकन कारखान्याचे अध्यक्ष, मि. आलफ्रेड स्लोन, ह्यांनीं आपल्या मिळकतीमधून तीन कोटि रुपये, अर्थशास्त्राच्या मूलभूत सिद्धांतांच्या ज्ञानाचा प्रसार करण्याच्या उद्देशानें एक संस्था स्थापून तिच्या स्वाधीन केले आहेत. आर्थिक प्रश्नांचें महत्त्व दिवसानुदिवस वाढत चाललें असून राष्ट्रांचा अभ्युदय त्यांच्या मुळाशीं असलेल्या शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसारांत आहे ह्या जाणिवेनें सदरहु अत्यंत उपयुक्त कार्यासाठीं मि. स्लोन ह्यांनीं वरील उदार देणगी दिली आहे. आर्थिक विषयांसंबंधानें चौकशी व शोध व्हावेत आणि लोकांस आर्थिक तत्त्वांची माहिती दिली जाऊन जनतेचें जीवित अधिक सुखाचें व्हावें ह्याकरितां स्वतःच्या उद्योगानें केलेल्या द्रव्य-संचयाचा विनियोग वरील-प्रमाणें करण्याचें आपण ठरविलें असें मि. स्लोन ह्यांनीं बोलून दाखविलें आहे. ह्यासंबंधांत आमच्या देशांत अजून ओनामाहि झालेला नाहीं हें लक्षांत घेऊन लोकांनीं विधायक कार्यास लागलें पाहिजे. जिव्हाळ्याचे आर्थिक प्रश्न अर्थशास्त्रीय ज्ञानावांचून नीट सुटणें शक्य नाहीं; ह्याकरितां ज्ञानाच्या प्रसारास सहाय करणें प्रत्येक हिंदी नागरिकाचें कर्तव्य आहे.

---

## ब्रिटिश तज्ज्ञाची हिंदुस्थानांत नेमणूक

शेतीचीं जनावरें व दूधदुभत्याचा धंदा ह्यासंबंधानें हिंदुस्थानांत चौकशी करून त्यांच्या सुधारणेबाबत शिफारस करणारे ब्रिटिश तज्ज्ञ, डॉ. नॉर्मन राईट, ह्यांची दरमहा २,५०० रुपयांवर बंगलूर येथील इंपीरियल इंस्टिट्यूट ऑफ ॲनिमल हस्बंडी ह्या संस्थेचे संचालक म्हणून नेमणूक करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. ह्या इंस्टिट्यूटची पुनर्घटना करण्याचें विशेष महत्त्व सरकारास वाटत असून डॉ. राइट ह्यांनीं नुकताच अनुभव मिळवला आहे त्याचा ह्या देशास अधिक फायदा करून घेतां येईल अशी त्यांची समजूत असल्याचें दिसतें.

## तुपाच्या व्यापाराचें संघटन

शेतीच्या धंद्यांतला एक महत्त्वाचा जोडव्यवसाय ह्या नात्यानें दुधाचें तूप बनवून तें बाजारांत विकण्याच्या उद्योगाची नीट व्यवस्था लागणें अगत्याचें आहे. अलीकडे भेसळीच्या तुपाचा बाजारांत फार सुळसुळाट झाला असून जनतेस शुद्ध व सकस तूप खावयास मिळत नाहीं आणि प्रामाणिकपणानें हा धंदा करणारांस वाव रहात नाहीं. डॉ. राइट ह्या तज्ज्ञांनीं ह्या व्यापारासंबंधानें सूचना केल्या आहेत आणि सरकारच्या विद्यमानें त्याबाबत पहाणी होऊन तुपाच्या व्यापाराचें नियंत्रण करण्याची योजना अमलांत आणली जात आहे. हिंदुस्थानांत दर वर्षी ८० ते १०० कोटि रुपयांचें तूप खपतें. गाई-म्हशींच्या दुधाचें तूप ह्याप्रमाणें दोन कोटि मण इतकें तयार होतें. वनस्पतिजन्य कृत्रिम तूप तयार करण्याचे कारखाने अलीकडे निघाले असून त्यांचा प्रसार झपाट्यानें होत आहे. शेतीस सहायकारक जोडधंद्याची एका बाजूनें अव्यवस्था आहे आणि दुसऱ्या बाजूनें त्यास मारक असा कृत्रिम तुपाचा धंदा जोरावत आहे. तुपांत ८० टक्क्यांपर्यंत तेलाची व इतर भेसळ झालेली आढळते आणि तीहि वाढत्या प्रमाणांत पसरत असल्याचें दिसून येतें. कायद्याचें कडक नियंत्रण व धंद्याचें व्यवस्थित संघटन ह्या दोन उपायांचा अवलंब झाल्यावांचून प्रस्तुत प्रश्न सुटणार नाहीं. स्थानिक स्वराज्य संस्थांनीं ह्या कामीं विशेष लक्ष घालून जनतेच्या आरोग्याची जोपासना केली पाहिजे. तुपाची परीक्षा करण्यासाठीं प्रयोगशाळा कित्येक शहरांमध्यें स्थापन झाल्या आहेत. शुद्ध तुपाची व्याख्या आतां करण्यांत येऊन त्याचें वर्गीकरण व प्रतवारीहि झाली आहे. गाईच्या व म्हशीच्या दुधाचें तूप दोन स्वतंत्र वर्गांत येईल आणि त्यांच्या मिश्रणाचा निराळा वर्ग होईल. वर्ग व प्रत दर्शवणाऱ्या चिठ्या निरनिराळ्या रंगांत तयार करण्यांत आल्या आहेत आणि सरकारचे शेतीच्या मालाचे विक्रीसंबंधांतले सल्लागार त्या पुरवतील. त्यांचा दुरुपयोग करणारांस शासन होण्याची व्यवस्था केली जाईल. प्रांतिक सरकार व म्युनिसिपालिट्या ह्यांनीं शुद्ध तुपाची पैदास व विक्री ह्यांचे बाबतींत आवश्यक असलेली व्यवस्था करणें अगत्याचें आहे.

---

## मुंबई इलाख्यांतील वजन-मापाचा कायदा

वजन-मापाचा कायदा १९३५ मध्यें मुंबई इलाख्यांत अंमलांत आला. वजनांवर व मापांवर शिक्का मारण्याकरितां सरकारतर्फे फी वसूल करण्यांत येते. वजन-मापाच्या कायद्याची अंमलबजावणी करण्यास येणाऱ्या खर्चापेक्षा ही वसली बरीच मोठी असल्यास, फीच्या दरांत उतार करण्यांत येईल, असें त्यावेळीं सांगण्यांत आलें होतें. फीचे दर उतरवितां येण्याजोगी परिस्थिति आहे, असें अनुमान काढण्याजोगा सरकारास अद्याप अनुभव आलेला नाहीं. सुरवातीस खर्चापेक्षा उत्पन्न ज्यास्त आलें असलें तरी पुढें खर्च वाढून उत्पन्न कमी होईल, अशी अपेक्षा आहे.

— मनपसंत काम —
रिसवूड ब्रदर्स-टेलर्स
वक्तशीरपणाची गॅरंटी. सदाशिव हौदानजिक, पुणें.

## शेतकरी व शेतीमजूर

शेतकऱ्यांच्या जमिनीचें संरक्षण होत असतां शेत मालकांबरोबरच शेतमजुरांचें संरक्षण व्हावें असा मुद्दा गेल्या आठवड्यांत विधिमंडळांत झालेल्या चर्चेत पुढें मांडण्यांत आला होता. तरा लक्ष शेत मालकांस मिळणारें संरक्षण एकवीस लक्ष शेतमजुरांसहि मिळावें असा त्याचा हेतु होता. त्यास उद्देशून श्री. मुरारजी देसाई म्हणाले:—"शेतीचा धंदा करणारांच्या उत्पादनाच्या साधनांचें संरक्षण करण्याच्या हेतूनें सरकारनें प्रस्तुत योजना तयार केली आहे. शेतीमजुरांच्या उपजीविकेच्या साधनांचें हरण कोणतेंहि न्यायमंदिर किंवा सरकार करूं शकत नाहीं. कायद्याचा हेतु शेतकऱ्यांची कर्जें एकदम नाहींशीं करणें हा नसून कर्जफेड सोयीनें व प्रामाणिकपणें त्यांस करतां यावी व आपला धंदा अधिक कार्यक्षमतेनें करतां यावा हें त्याचें उद्दिष्ट आहे. शेतीचा धंदा जर चालणार नाहीं तर मजूरहि जगणार नाहींत ही गोष्ट खरी आहे; तथापि, परिस्थिति उत्पन्न होईल त्याप्रमाणें तिच्याविषयीं तरतूद करण्याचा सरकारचा विचार आहे. अमूक एक गोष्ट घडण्याचा संभव आहे, एवढ्यासाठी आजच त्यावर उपाययोजना करण्याची आवश्यकता नाहीं."

ह्याच विषयावर श्री. मुनशी ह्यांनीं खालील उद्गार काढले:— "प्रस्तुत बिलाच्या कक्षेमधून सरकारनें शेती-मजूर मुद्दाम वगळले आहेत असें सांगण्यांत येत आहे. वस्तुतः बिलानें ज्याचें जमिनींत हितसंबंध आहेत अशा प्रत्येकास ( जमीन एक इंचभर असली तरी ) संरक्षण दिलें आहे. मालक, धारण करणारे, कायमचीं व हंगामी कुळें ह्या सर्वांचा समावेश त्यांत केलेला आहे. सिव्हिल प्रोसीजर कोडाप्रमाणें शेतीचीं साधनें आणि शेती मजुरांच्या धंद्याची व्यवस्था ह्यांचें संरक्षण होतच आहे. त्यांस कोणासहि हात लावतां येत नाहीं. डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट्स रिलीफ ॲक्टानें सर्व प्रामाणिक शेतकऱ्यांस संरक्षण दिलें आहे. ज्यांस सध्याच संरक्षणाची पूर्ण सोय आहे, त्यांस नव्यानें तें देण्याची आवश्यकता नाहीं."

### ग्रंथ प्रकाशक व ग्रंथविक्रेते

पुण्यांतील बुकसेलर्स व प्रकाशक यांची दुसरी बैठक ता. २८ जानेवारी रोजीं रात्रीं भरली होती. सभेला श्रीयुत एन. टी. भिडे, आर. व्ही. कुलकर्णी, मा. स. कुलकर्णी, भा. प. बापट, जी. पी. भागवत इत्यादि १२मंडळी आली होती. दर शनिवारीं सकाळीं दुकानें बंद ठेवून सुटी द्यावी असें ठरलें आणि हजर असलेल्या बुकसेलर्सनीं आपापलीं दुकानें सुटीनिमित्त ता. ५ फेब्रुवारी पासून बंद ठेवण्याचें ठरविलें आहे.


## नोटीस

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

नोटीस देण्यांत येते कीं, बँकेच्या भागीदारांची तिसरी साधारण सभा रविवार ता. २७ फेब्रुवारी १९३८ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां ( स्टँ. टा. ) नुतन मराठी विद्यालय हायस्कूल, असेंब्ली हॉल, २१ बुधवार, पुणें शहर, या ठिकाणीं खालील कामासाठी भरेल.

( १ ) बँकेचे ता. ३१ डिसेंबर, १९३७ अखेरचे नफा-तोटा पत्रक, ताळेबंद आणि डायरेक्टर बोर्डाचा व ऑडिटर्सचा रिपोर्ट यांचा विचार करणें.

( २ ) डिव्हिडंड मंजूर करणें.

( ३ ) निवृत्त होणाऱ्या ( फेर निवडणुकीस पात्र असलेल्या ) डायरेक्टरांचे जागीं डायरेक्टरांची निवडणूक करणें.

( ४ ) ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

( ५ ) अध्यक्षांचे परवानगीनें पुढें येणारीं इतर कामें.

बोर्डाचे हुकुमावरून

पुणें. ता. २३-१-३८ — एम. व्ही. गोखले. मॅनेजर

वि. सू. बँकेची शेअर ट्रॅन्स्फर बुकें ता. २५-२-३८ ते ३-३-३८ ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहतील.



## फक्त तीनच वर्षें—

१९३७ मध्यें पुरें केलेलें काम २ कोटी ५ लाख रुपयांवर

### विम्याचे हप्ते भरा

पुढें कोणत्याहि कारणामुळें जरी तुम्हास पैसे भरतां आले नाहींत तरी विम्याच्या पूर्ण रकमेची

**आम्ही हमी घेतों.**

आजच आमच्या एक्स्टेन्डेड ॲशुअरन्स स्कीमबद्दल लिहा:—

आमचें बेळगांव ऑफिसः— व्ही. आर. नाईक, बी.ए., एलएल. बी. इन्स्पेक्टर ऑफ एजन्सीज् १६७६ बोगार वेस, बेळगांव.

डॉ. आर. के. गवंडे, ब्रँच सेक्रेटरी.

आमचें मांबुर्डा सब-ऑफिसः— एस्. व्ही. केळुस्कर, इन्स्पेक्टर ऑफ एजन्सीज्, सोळस्कर यांचा बंगला, डेक्कन जिमखाना, पुणें ४.

**भारत इन्शुअरन्स कंपनी, लिमिटेड.** १७०५, लक्ष्मी रोड, पुणें २.

## मुंबईतील प्राथमिक शिक्षण आणि शिक्षकवर्गाची आर्थिक स्थिति

वरील विषयावर मुंबईच्या प्रायमरी टीचर्स असोसिएशनच्या विद्यमानें श्री. भास्कर महादेव काळे, एम्. ए., बी. टी., यांनीं स्कूलसकमिटीचे सेक्रेटरी, श्री. रा. वि. परुळेकर, एम्. ए., एम्. टी याच्या अध्यक्षतेखालीं ता. २३ जानेवारी रोजीं व्याख्यान दिलें. मुंबईच्या म्युनिसिपालिटीवर प्राथमिक शिक्षणासंबंधानें जबाबदारी प्रथम १८८८ सालीं टाकण्यांत आली. यासाठी जॉइंट स्कूलसकमिटी स्थापन करण्यांत येऊन ती १९०९ पर्यंत होती. सरकार शिक्षणासाठी प्रतिवर्षी कांहीं ग्रँट देई. १८९२ सालीं शाळेंत जाणाऱ्या मुलांची संख्या सहा हजार होती ती १९०९ सालीं दहा हजारांवर गेली. शाळेंत शिकणाऱ्या प्रत्येक मुलामागें सरासरी वार्षिक खर्च १८९६ सालीं रु. १३–६ होता, तो १९०८ सालीं रु. २१–५ इतका वाढला १९०७ सालीं पोलीस चार्जेस ॲक्ट पास झाल्यामुळें प्राथमिक शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी म्युनिसिपालिटीकडे आली. सध्यांची स्कूलस-कमिटी १९०९ सालीं स्थापिली गेली व सरकारनें ग्रँट देण्याचें बंद केलें. १९१० नंतर शिक्षणाचा प्रसार फार वाढला. मुलांची संख्या १९१४ सालीं १४ हजार, १९२० सालीं २८ हजार, १९३२ सालीं ६२ हजार, १९३६ सालीं ७२ हजार याप्रमाणें होती व सध्यां सुमारें ८० हजार मुलें म्युनिसिपल शाळांतून शिकत आहेत. मुलामागें होणारा सरासरी वार्षिक खर्च १९१९ सालीं तो रु. २८-८ होती, त्यानें १९२७ सालीं रु. ५९–९ ही कमाल मर्यादा गांठली, व तेव्हांपासून काटकसरीच्या धोरणामुळें १९३१ सालीं हा आंकडा रु. ५०–९ इतका उतरला व १९३५ सालीं रु. ४२–४ पर्यंत आला. पुढें–मागें सक्तीचें प्राथमिक शिक्षण सुरू करावें ह्या उद्देशानें सरकार १९१९ पासून पुनः ग्रँट देऊं लागलें. हल्लीं म्युनिसिपालिटीचा प्राथमिक शिक्षणावर ३२ लाख रुपये खर्च होतो, व त्यापैकी सरकार फक्त ६½ ते ७ लाख रुपये इतका खर्च देतें. शिकणारीं मुलें व प्रतिवर्षी होणारा खर्च यांची तुलना करून श्री. काळे यांनीं दाखविलें कीं १८८९ ते १९०९ व १९१९ ते १९२५ ह्या काळांत शिक्षणपद्धति कार्यक्षम करण्याच्या दृष्टीनें खर्च केला गेला.

शिक्षक वर्गाच्या आर्थिक स्थितीसंबंधानें श्री. काळे यांनीं म्युनिसिपालिटींत काम करीत असलेल्या दोन हजारांवर शिक्षकां-कडून चौकशीचे तक्ते स्वतः भरून घेऊन माहिती मिळविली. शिक्षकांपैकी ५७ टक्के लोकांनीं माहिती दिली. १२ टक्के शिक्षक मुंबईतील रहाइक असून, ७८ टक्के मुंबई इलाख्यांतील आहेत व १० टक्के हिंदुस्थानच्या इतर सर्व प्रांतांतून येतात. परप्रांतीय शिक्षक सर्व उर्दू आहेत. २८ टक्के शिक्षकांना मिळणारा पगार अल्प म्हणजे दरमहा रु. ३० हून कमी आहे, ४७ टक्के शिक्षकांना घरभाड्यावर अगदीं अपुरा खर्च करावा लागतो व ५२ टक्के शिक्षकांवर कुटुंबपोषणाची, त्यांच्या उत्पन्नाचे मानानें जास्त जबाबदारी पडते. यामुळें ५६ टक्के शिक्षकवर्ग कर्जबाजारी झाला असून, कर्ज असणारांपैकी शेकडा ६५ कर्जें रकमेनें रु. ५०० च्या आंतील, व बाकी ३५ टक्के रु. ५०१ ते ३,००० पर्यंत आहेत. एकूण कर्जापैकी निम्में सहकारी बँकांमार्फत काढलेलें आहे. कौटुंबिक खर्च, आजारीपण, विवाहादि कार्यें हीं कर्ज होण्याचीं मुख्य कारणें आहेत. एक तृतीयांश शिक्षकांनीं विमा उतरला असून, फक्त १६ टक्के शिक्षकांची स्वतःची थोडी-बहुत जमीन आहे. निरनिराळ्या दृष्टींनीं विचार करतां असें दिसतें कीं गुजराथी स्त्री-शिक्षकवर्ग सर्वांत सुस्थितींत आहे व उर्दू स्त्री-शिक्षक-वर्ग मागसलेला आहे. मराठी, गुजराथी, उर्दू पुरुष शिक्षक साधारणतः एकाच प्रकारच्या स्थितींत आहेत. मराठी स्त्री-शिक्षक-वर्गाची स्थिति बरी आहे.

शेवटीं श्री. काळे यांनीं शिक्षणपद्धति सुधारण्यासाठी खालील विधायक सूचना केल्या:–( १ ) स्कूलसकमिटीची सध्यांची जातिनिष्ठ घटना (१९३२ च्या बोले यांच्या बिलमुळें झालेली) तावडतोब रद्द केली पाहिजे. ( २ ) कमिटीला स्वतःचा खर्च करण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. कमिटीला आर्थिक स्वातंत्र्य मिळालें पाहिजे. ( ३ ) सेक्रेटरीचे अधिकार वाढविले पाहिजेत. ( ४ ) सध्यां शाळांच्या भाड्यासाठी वार्षिक ४½ लक्ष रुपये खर्च होतो, तरी एक कोटीचें कर्ज उभारून शाळांसाठी इमारती बांधण्याचें काम म्युनिसिपालिटीनें हातीं घ्यावें. ( ५ ) शिक्षकांच्यासाठी ट्रेनिंग क्लास उघडावा. ( ६ ) सक्तीचें शिक्षण बाकीच्या वार्डांत ( सध्यां फक्त दोनच वार्डांत आहे ) सुरू करावें. ( ७ ) शिक्षणक्रम पांच वर्षांचा आहे तो चार वर्षांचा करावा.

श्री. परुळेकर यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत, शिक्षण व शिक्षकांची आर्थिक स्थिति याबद्दल माहिती फार चिकाटीनें मिळविल्याबद्दल श्री. काळे यांचे आभार मानले व स्कूलस कमिटीला आर्थिक स्वातंत्र्य असावें ह्या मुद्यावर विशेष जोर दिला.

THE HOUSE OF MODERN STYLE SUITS.

THE DECCAN TAILORING FIRM, DECCAN GYMKHANA, POONA 4.

TAILORS & CLOTH MERCHANTS

—A FRESH STOCK OF NEW DESIGNS—

WOOLEN, COTTEN AND SILK SUITINGS, SHIRTINGS AND TROUSER FLANELS.

LONDON TRAINED CUTTER.

MANAGER—M. N. PATASKAR, F. C. D. (London).

## एकाच्या दोषाचा परिणाम दोन निर्दोषी त्रयस्थांपैकी कोणी भोगावा ?

### मर्कंटाइल बँक विरुद्ध सेंट्रल बँक

मर्कंटाइल बँक ऑफ इंडिया लि. विरुद्ध सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. ह्या दाव्यांतील प्रीव्ही कौन्सिलपुढील अपिलाचा निकाल नुकतांच लागला. त्यांतील तत्त्व महत्त्वाचें असल्यानें दाव्याच्या हकीकतीचा सारांश खाली देण्यांत येत आहे:—

मद्रास येथील मेसर्स सी. के. नारायण अय्यर अँन्ड सन्स हे भुइमुग निर्गत करण्याचा धंदा करीत असत. भुइमुग मोठ्या प्रमाणावर खरेदी करून तो मद्रासला पाठविण्याची त्यांची पद्धति होती. मद्रास येथें हा माल रेल्वे कंपन्यांच्या गोडाउनमध्यें येऊन पडत असे. रेल्वे रसीद दाखल केली म्हणजे माल गोडाउनमधून सोडवतां येई. रसीद बँकेकडे तारण ठेवून नारायण अय्यर अँन्ड सन्स ह्यांस कर्ज उभारतां येत असे. बँक नंतर रेल्वेकडून माल सोडवून आणून आपल्या कोठारांत ठेवीत असे. हें काम बँकेनें कोठारदाराकडे सोपविलें होतें. प्रस्तुत प्रसंगीं, कोठारदारानें स्वतः माल न सोडवतां, नारायण अय्यर अँन्ड सन्स ह्यांसच तें काम सांगितलें व त्यांच्या स्वाधीन रेल्वे रसीद केली. त्यांनीं मात्र आपल्या पूत्र लौकिकास विसंगत अशी कृति करून सेंट्रल बँकेस ठकविण्याचें धारिष्ट्य केलें. त्यांनीं रेल्वे रसीद मर्कंटाइल बँक ऑफ इंडियाकडे तारण ठेवून त्या बँकेकडून कर्ज मिळविलें. ही लबाडी लवकरच उघडकीस आली, परंतु मध्यंतरीं नारायण अय्यर फर्मचें दिवाळें निघालें व वरील व्यवहारांतील नुकसान कोणत्या बँकेनें सोसावें, हा प्रश्न उपस्थित झाला. दोनहि बँकांनीं मालावर आपला हक्क सांगितला.

रेल्वे रसीद प्रथम सेंट्रल बँकेकडे गहाण ठेवण्यांत आली होती; तेव्हां मर्कंटाइल बँकेशीं झालेला व्यवहार गैरकायदा होता, असें सेंट्रल बँकेतर्फे सांगण्यांत आलें. सेंट्रल बँकेनें रसीद नारायण अय्यर अँन्ड सन्स ह्यांचे परत स्वाधीन केली नसती, तर त्यांस अशी ठकबाजी करतां आली नसती; तेव्हां सहाजिकच त्या बँकेचा रसिदीवरील हक्क शाबीत होऊं शकत नाहीं, असें मर्कंटाइल बँकेचें म्हणणें होतें. सर्वसाधारणपणें हें तत्त्व ग्राह्य असलें, तरी सेंट्रल बँक असें न करण्याविषयीं मर्कंटाइल बँकेस बांधलेली नव्हती, ह्या मुद्यावर प्रीव्ही कौन्सिलनें सेंट्रल बँकेचें म्हणणें ग्राह्य ठरविलें व तिच्या बाजूनें निकाल दिला. अशाच प्रकारच्या इतर दाव्यांत उलट बाजूनें निकाल दिला असल्याचीं ग्रेट ब्रिटनमध्यें उदाहरणें आहेत. प्रस्तुत निकाल ग्रेट ब्रिटनमधील व्यवहारांवर बंधनकारक नसला तरी दाखला म्हणून त्याचें महत्त्व विशेष आहे. हिंदुस्थानांतील कोर्टांस मात्र हा निकाल मार्गदर्शक होणार आहे.

---

### ट्रेझरी बिलांवर द. सा. द. शे. १ रु. ५ आ. ५ पै व्याज

गेल्या १ तारखेस दोन कोटि रुपयांच्या तीन महिने मुदतीच्या ट्रेझरी बिलांविषयींची टेंडरें उघडलीं तेव्हां ३ कोटि ६७ लक्षांची मागणी असल्याचें आढळलें. दर शंभर रुपयांच्या बिलाला ९९ रु. १० आ. ९ पै ह्या दराचीं सर्व टेंडरें स्वीकारण्यांत येऊन ९९ रु. १० आ. ६ पै दराचीं ६१ टक्के इतकीं घेतलीं गेलीं. ह्या खालचीं सर्व अव्हेरण्यांत आलीं. स्वीकारलेल्या टेंडर्सची एकूण रकम २ कोटि रुपये होती आणि त्यांचा व्याजाचा सरासरीचा दर द. सा. द. शे. १ रु. ५ आ. ५ पै इतका बसला. चालू आठवड्यांत दीड कोटि रुपयांच्या तीन महिने मुदतीच्या ट्रेझरी बिलांचीं टेंडरें मागवण्यांत आलीं आहेत.


## न्यू इंडिया अॅशुअरन्स कं. लि. मुंबई

**( सर्व तऱ्हेचें विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी. )**

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यतः खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो:—

(१) कंपनीचें स्थैर्य. ( २ ) उत्तम व्यवस्था.
(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता.

"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल.

प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.

श्री. डी. के. जोगळेकर, बी. ए.,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें ( २ )

---

## औंध स्टेट सेंट्रल बँक लिमिटेड, औंध.

( स्थापना—८ आक्टोबर १९३२ )

हेड ऑफिस—औंध ( सातारा )

शाखा—आटपाडी, कुंडल, गुणदाळ, किर्लोस्करवाडी स्टेशन व दिघंची.

चालू ठेवीवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जें—सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जें दिलीं जातात.

चेक, हुंड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.
शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B. R. Vartak
मॅनेजर.

---

## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध **आर्डोमिक्स** ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेते:—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )**

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, **पुणें शहर.**

## रत्नागिरी सेंट्रल को. इन्स्टिटयूट

१९३६-३७ अखेर इन्स्टिट्यूटच्या सभासदांची संख्या ६८ सोसायट्या व २७ व्यक्ती मिळून ९५ इतकी होती. सालोसाल वर्गणीच्या वसुलीचें प्रमाण वाढत आहे. अहवालाचे वर्षी नवीन संस्था रजिस्टर झाली नाहीं. नवीन शेतकी पतपेढ्या स्थापन न करण्याचें सहकारी खात्याचें धोरण आतां बदललें पाहिजे, अशी अहवालांत सूचना आहे. रत्नागिरी जिल्ह्यांतील सोसायट्या एकमेकांपासून दूर असल्यामुळें सहकारी शिक्षण वर्ग भरविणें कठीण जातें. अहवालाचे मुदतींत प्रचारकांनीं एकूण ५४ सोसायट्यांस भेट दिली व १५ मंडळ्यांचे साधारण सभांस आणि १५ मंडळ्यांचे व्यवस्थापक कमिट्यांचे सभांस ते हजर होते. बिघडलेल्या सोसायट्यांचें काम सुधारण्याकरितां केलेल्या प्रयत्नांची माहिती अहवालांत देण्यांत आली आहे. शेतकी पतपेढ्यांचे संख्येंत बिलकूल फरक पडला नसला तरी त्यांची कर्जवसुली, नवीन कर्जें व खेळतें भांडवल ह्यांत वाढ झाली आहे. परंतु एकंदरीनें विचार केला असतां पतपेढ्यांची परिस्थिति दिवसानुदिवस चिंताजनकच होत चालली आहे, असें अहवालांत म्हटलें आहे. अर्बन बँकांची प्रगति व त्यांवरील लोकांचा विश्वास हीं वाढत आहेत. "इलाख्यांतील इतर बऱ्याच इन्स्टिटयूट्सपेक्षा ही इन्स्टिटयूट सहकारी चळवळीचे प्रसाराकरितां ज्यास्त कसोशीनें यत्न करीत आहे" ह्या ऑडिटरांच्या शेऱ्यांतील अभिप्रायाची सत्यता रिपोर्टांतील वृतांतावरून सहज पटण्यासारखी आहे.

---

## मध्यप्रांतांतील जमीन–गहाणाच्या बँका

मध्यप्रांत व वऱ्हाड ह्यांमध्यें एकूण १५ जमीन गहाणाच्या बँका चालू असून नवीन संस्थांच्या स्थापनेची तयारी चालली आहे. ह्या सर्व बँकांची मिळून एक स्वतंत्र बँक नाहीं, ह्याकरितां पुरेसा व्यवहार चालू होईतोंपर्यंत सी. पी. अँड बरार प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह बँक हीच मध्यवर्ती संस्थेचें काम करीत आहे. सर्व बँकांचे व्यवहारांत मिळून ४ लक्ष, ४२ हजार रुपये इतकें भांडवल गुंतलेलें आहे. १९३६–३७ सालीं कर्जासाठी ५०० अर्ज आले होते, त्यांपैकीं २८१ मंजूर झाले आणि त्यांवर २ लक्ष ६४ हजार रुपये कर्जाऊ देण्यांत आले. आलेल्या व यावयाच्या वसुलाच्या मानानें वसूल व्हावयाची रकम फारच थोडी आहे. एकूण सभासदांस कर्जें दिलीं गेलीं त्यांची रकम आतां १ लक्ष ३८ हजारांवरून ३ लक्ष, ८५ हजारांवर गेली आहे. ह्या कर्जाबद्दल २७ हजार एकर जमीन व ६४ घरें गहाण आहेत आणि गहाण मालमत्तेची किंमत १२ लक्ष ९४ हजार रु. आहे. गेल्या ऑक्टोबरच्या प्रारंभापर्यंत प्रांतिक बँकेनें ४ लक्ष, ५३ हजार रुपये निरनिराळ्या बँकांस कर्जाऊ दिले आहेत. ह्यापैकीं ४ लक्ष रुपये त्या बँकेनें डिबेंचर्सच्या विक्रीवर उभारले आहेत. तिच्या व्याजाचा दर ५ टक्के आणि बँकांचा सभासदांकरितां दर ७ टक्के आहे.

---

## म्हैसूर संस्थानांत सहकारी चळवळ

आर्थिक मंदी आणि तिच्या तडाक्यांतून चळवळीस वांचवण्याचे उपाय ह्यांचा परिणाम म्हैसूर संस्थानांतील सहकारी संस्थांवर झालेला आहे आणि त्याचें प्रतिबिंब १९३६–३७ च्या चळवळीच्या वृत्तांतांत दिसून येतें. ह्या वर्षी ७२ सहकारी संस्था रद्द झाल्या व २३ नव्या स्थापल्या गेल्या. एकूण सोसायट्यांची संख्या पूर्वीच्या वर्षी १,९०६ होती तिच्या मध्यें १९३६–३७ सालीं घट होऊन ती १,८६२ झाली. एकूण खेळतें भांडवल थोडेसें वाढलें असलें तरी दिलेलीं कर्जें, झालेली वसुली आणि मिळालेला नफा हीं सर्वच घटलीं. शेतकी पतपेढ्यांमध्येंही घट विशेषें करून दिसून आली. निकामी झालेल्या सोसायट्या रद्द करण्यांत आल्या कारणानें ह्या पतपेढ्यांतल्या सभासदांची संख्या कमी झाली.


## जाहीर नोटीस.

### औंध स्टेट सेंट्रल बँक लि. औंध

शाखा:—आटपाडी, कुंडल, गुणदाळ, विचूर, दिघंची

आम्ही मुदतठेवी खालील व्याजाचे दरानें स्वीकारतों :—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मुदत | १ | वर्ष | द. द. | २ | टक्के. |
| ,, ,, | २ | ,, | ,, ,, | २॥ | टक्के. |
| ,, ,, | ३ | ,, | ,, ,, | ३ | टक्के. |
| ,, ,, | ४ | ,, | ,, ,, | ३॥ | टक्के. |
| ,, ,, | ५ | ,, | ,, ,, | ४ | टक्के. |

औंध, ( जि. सातारा ) ता. २०–१–३८. } बी. आर. वर्तक, मॅनेजर.

---

## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

| | |
|---|---|
| उभारलेलें भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,०५,५०,००० |

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), वांद्रें ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), कुलाबा ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता–बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

### चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंट:— टी. आर. लालवाणी.

---



एच. एच. दि छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखालील

## जाधव कॉलेज ऑफ टेलरिंग अँन्ड कटिंग

जानेवारीपासून नवीन वर्ग सुरू झाले. नांवें नोंदवा.

नवीन माहितीपत्रक मागवा. ४९७ बुधवार, पुणें.

---

## K. K. & Co.

**Photographic Dealers**

**POONA.**

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ... ३%

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११९–१२ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०४—९ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८–१२ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९८–१३ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०६—८ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | १००—९ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... .. | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% ... ... | १५०—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११५—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% ... | ३२—४ |
| इंपीरिअल बँक ( ५० ) १२% ... ... | १५७७—८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११९–१२ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... ... | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९६—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु. ४ आ. बोनस | ९४५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७५२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १२०—० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २०२—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३३०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४२७—८ |

## पुणें येथील स्मॉल कॉज जज्ज यांचे कोर्टांत

### मुक्काम पुणें येथें

दिवाणी मुकद्दमा नंबर ३१३६ सन १९३७ पैकीं

चिमणलाल वाडीलाल कंपनी, पुणें, सदाशिव. } वादी

विरुद्ध

एस. डी. देवस्थळे, लोण.वळे, धंदा व्यापार. वय ३० } प्रतिवादी

प्रतिवादी यांस:—

ज्यापेक्षां वादी यानें तुम्हांवर बद्दल दावा केला आहे, त्यापेक्षां सदरहू दाव्याचा जबाब देण्यासाठीं ता. ४ माहे ३ सन १९३८ रोजीं दिवसां ११ वाजतां जातीनें किंवा ज्या कोणा प्लीडरास योग्य माहिती दिली असेल व दाव्यासंबंधीं सर्व मुद्यांच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल, किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्याबरोबर असेल अशा प्लीडराच्यामार्फत या कोर्टांत हजर होण्याविषयीं या लेखावरून तुम्हांस समन्स करण्यांत येत आहे; व तुम्हीं हजर होण्यासाठीं जो दिवस ठरविला आहे तो दाव्याच्या अखेर निकालासाठीं नेमिला आहे. यास्तव ज्यांच्या जबानीवरून व ज्या दस्तऐवजांवरून तुमच्या जबाबास बळकटी येईल असा भरवसा बाळगण्याचा तुमचा इरादा असेल तसे सर्व साक्षीदार व तसे सर्व दस्तऐवज त्या दिवशीं हजर करण्यास तुम्हीं सिद्ध असलें पाहिजे.

तुम्हांस नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरीं लिहिलेल्या दिवशीं तुम्हीं हजर न झाल्यास तुमच्या परोक्ष दाव्याची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

तसेंच तुम्हांस अशीहि नोटीस देण्यांत येत आहे कीं, निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा तिच्यापूर्वी बजावणीसाठीं पत्ता लिहून देण्यांत तुम्हीं कसूर केल्यास तुमच्या बचावाकडे लक्ष देण्यांत येणार नाहीं.

आज तारीख २ माहे २ सन १९३८ रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्क्यानिशीं दिली.

Sd. S. M. Chawan,
for Registrar.

शिक्का

लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत."

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.,

मॅनेजिंग एजंटस्,

दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड

११ बुधवार पेठ, पुणें नं. २.

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंटस् नेमणें आहेत. तरी विशेष माहिती-करितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करावा.

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्त पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

**S. B. JOSHI & Co.**

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A. Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

**पायोनियर डाईंग हाऊस, पुणें,**

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

परोयाक प्रिंटिंग, वडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ.

पत्ता बदलला

**मराठी केन्द्र**

हें

१ जानेवारी १९३८ पासून

२९२, सदाशिव पेठ, ट्रेनिंग कॉलेजजवळ गेली आहे.

SAHYADRI MFG. CO. NASIK

BEST TO CHOOSE & TO REPRESENT

WANTED WORKERS OF EITHER SEX.

Particulars by post or in person.

**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळः—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

**चा**लू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

**से**विंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

**मु**दतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

**क**र्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.

**स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा**

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २४, किंवा प्रथम ६८८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ महून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इन्व्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.




पुणें एजंटः—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें

अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.

सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.



बेडेकर

टेकन मसाला


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.